# भिवंडी नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.
# जि.ठाणे.

## महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना भिवंडी महानगरपालिकेतर्फे मानवंदना.

१ मे १९६० रोजी संयुक्त महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या रुपांत महाराष्ट्राला मिळाले,त्यांच्याकडे प्रत्येक विषयांत दूरदृष्टी होती.राजकिय जीवनांतच नव्हे तर साहित्य,संस्कृती,शिक्षण इ.क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे होते.त्यामुळे सत्ता हातात आल्यावर त्याचा त्यांनी दुरुपयोग न करता,शुल्क माफीची योजना खेड्यातील गरीबांच्या मुलांना शिकता यावे यासाठी राबविली.कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठ व औरंगाबादेतील मराठवाडा विद्यापीठांची निर्मिती करुन महाराष्ट्रांमध्ये शैक्षणिक पाया मजबूत करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.अशा चतुरस्त्र व्यक्तिमत्व,गुणसंपन्न चारीत्र्यवान राष्ट्रीय स्तरावर अग्रणी असलेल्या या जेष्ठ व निस्वार्थी नेत्याला,शासनाच्या निर्देशानुसार व मा.आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांच्या आदेशानुसार त्यांच्या उपस्थितीत भिवंडी महानगरपालिकेचे महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन,त्यांच्या आठवणींना व कार्याला उजाळा देत त्यांना आज महानगरपालिकेतर्फे जयंतीनिमित्त मानवंदना देण्यांत आली.

यशवंतराव चव्हाण हे उत्तम लेखक होते.त्यांनी आपल्या आयुष्यातील १९१२ ते १९४६ पर्यंतच्या कालखंडाचा आढावा घेणारे **कृष्णकाठ** हे आत्मचरित्र लिहिले.त्यांच्यावर महात्मा गांधी व पंडित नेहरु यांच्या विचारसरणीचा प्रामुख्यांवर प्रभाव होता.अशा कर्तृत्ववान व चारित्र संपन्न,विकासासाठी एक ठाम निर्णय घेणारे निस्वार्थी राष्ट्रीय नेता म्हणून चित्रपट क्षेत्रांनेही त्यांच्या कार्याची नोंद घेत,त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर **बखर एका वादळाची** या मराठी चित्रपटाची निर्मिती करण्यांत आली.त्यांची ख्याती सर्व सामान्यांमध्ये होती.अशा राष्ट्रीय नेत्याला मानवंदना देणे ही अभिमानाची गोष्ट आहे,असे मनपा आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी उप-आयुक्त (मुख्यालय)सौ.विजया कंठे, शहर अभियंता श्री.सुधीर बोरीकर, सहाय्यक संचालक श्री.रं.स.राठोड, नगररचनाकार श्री.प्र.शा.रविराव, सहाय्यक आयुक्त(प्रशासन)श्री.सुभाष झळके, प्रभाग अधिकारी श्री.एच.पी.माने, माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री.सुनिल झळके, उप-अग्निशमन अधिकारी श्री.राजेश गुरव, आरोग्य विभाग प्रमुख श्री.महेंद्र सोनावणे, आपत्कालिन विभाग प्रमुख श्री.नामदेव गायकवाड इ.अधिकारी व कर्मवारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भिवंडी महानगरपालिकेतर्फे जलजागृती सप्ताहाचे आयोजन.

संपूर्ण महाराष्ट्रांत पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाण्याची सर्वत्र तीव्र टंचाई भासू लागली आहे.भिवंडी शहराला पाणीपुरवठा करणा-या तानसा धरण,आंध्र धरण,बारवी धरणामधील पाणलोट क्षेत्रांत उपलब्ध पाण्याचा साठा माहे.जुलै २०१६ अखेर पर्यंत नियोजन करण्यासाठी पाणी पुरवठ्यांत कपात करुन सर्वाना पाणी शहरभर पाण्याचे नियोजन करुन पुरविले जात आहे.भविष्यामध्ये पाणी व्यवस्थितपणे पुरविणे अनिवार्य झाल्याने प्रत्येकाने पाण्याची बचत करणे गरज बनलेली आहे.त्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार लोकसहभागातून जल समृध्दीकडे राज्यातील प्रत्येक व्यक्ती-शेती-उद्योगांस

आवश्यक पाणी,पाण्याच्या थेंबाथेंबातून अधिकाधिक उत्पादन करणे,ग्रामीण व शहरी भागांत पाण्याचा काटकसरीने वापर आणि सुक्ष्म सिंचन,आधुनिक तंत्रज्ञान,कल्पक पीक पध्दतीव्दारे महाराष्ट्र समृध्द करण्याचा महाराष्ट्र शासनाच्या दृढ संकल्पाप्रमाणे भिवंडी निजा.शहर महानगरपालिकेच्यावतीने दि.१६ मार्च २०१६ ते दि.२२ मार्च २०१६ पर्यंत **जलजागृती सप्ताहाचे** आयोजन केले असल्याचे महानगरपालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी सांगितले आहे.

या जलजागृती सप्ताहाच्यानिमित्ताने लोकसहभागातून जनजागृती व्हावी म्हणून महानगरपालिकेचे मा.महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी,महानगरपालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर,महानगरपालिकेचे सर्व सन्मा.पदाधिकारी,मनपा अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या उपस्थितीत महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकिय इमारतीच्या प्रांगणांत दि.१६ मार्च २०१६ रोजी सकाळी १०:३० वाजता कार्यक्रमाव्दारे पाणी बचतीबाबत जल प्रतिज्ञा घेण्यांत येणार आहे.

सदर जलजागृती सप्ताहामध्ये महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत दि.१६ मार्च २०१६ ते दि.२२ मार्च २०१६ पर्यंत संपूर्ण भिवंडी शहरामध्ये दवंडीव्दारे जलजागृती,पथनाट्य,मनपा शाळा विद्यार्थ्यांची जलजागृती व पाणी बचत या विषयावर निबंध स्पर्धा,मुख्य प्रशासकिय इमारत ते धामणकर नाका पर्यंत रॅलीचे आयोजन,विविध ठिकाणी मनपाच्या पाणी पुरवठा कर्मचा-यांमार्फत नागरींकांशी संवाद,जागतिक जल दिनानिमित्त पाण्याची किंमत व पाणी बचत चिंतनाचा विषय यावर व्याख्यान,शहरभर जनजागृतीसाठी बॅनर्स-पोस्टर्सव्दारे प्रसिध्दी करणे अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करुन नागरीकांना पाणी बचतीविषयी जलजागृतीचे महत्व समजावून देऊन **जलजागृती सप्ताहानिमित्त** महानगरपालिकेच्यावतीने करण्यांत येणार असल्याचे मनपा आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी सांगितले.

## पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करणे काळाची गरज

**- महापालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांचे प्रतिपादन.**

पावसाचे पाणी यंद्या व्यवस्थित न पडल्यामुळे सर्वत्र जी तीव्र पाणी टंचाईचे प्रश्न निर्माण झालेले आहे,त्यावर सर्वांनी आत्मचिंतन करुन पाण्याचे प्रत्येक थेंब आपण प्रत्येकाने वाचविला पाहिजे व या प्रत्येक थेंबाची बचत करीत पाण्याची उपलब्धता आपणच करुन नियोजन करण्याची काळाचीच गरज बनली असल्याचे प्रतिपादन भिवंडी महानगरपालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी आज शासन निर्देशानुसार पाणी बचतीसाठीचे महत्व लोकसहभागातून व्हावे यासाठी आयोजित केलेल्या जलजागृती सप्ताहानिमित्त जल प्रतिज्ञा घेतांना केले.या जलजागृती सप्ताहाचे उद्‌घाटन भिवंडीचे महापौर,श्री.तुषार यशवंत चौधरी यांच्या हस्ते करण्यांत आले.

मनपा मुख्य कार्यालयाच्या प्रांगणांत जल प्रतिज्ञा प्रसंगी आयुक्त श्री.खतगांवकर पुढे म्हणाले की,पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या जल संपदा विभागामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.मात्र पाणी टंचाईचा प्रश्न हा जनतेचा सक्रिय सहभाग व सहकार्य मिळाल्याशिवाय संपूर्ण महाराष्ट्रांत पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाण्याची सर्वत्र तीव्र टंचाई भासू लागली आहे.भिवंडी शहराला पाणीपुरवठा करणा-या तानसा धरण,आंध्र धरण,बारवी धरणामधील पाणलोट क्षेत्रांत उपलब्ध पाण्याचा साठा माहे.जुलै २०१६ अखेर पर्यंत नियोजन करण्यासाठी पाणी पुरवठ्यांत कपात करुन सर्वाना पाणी शहरभर पाण्याचे नियोजन करुन पुरविले जात आहे.भविष्यामध्ये पाणी व्यवस्थितपणे पुरविणे अनिवार्य झाल्याने प्रत्येकाने पाण्याची बचत करणे गरज बनलेली आहे.त्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार लोकसहभागातून जल समृध्दीकडे राज्यातील प्रत्येक व्यक्ती-शेती-उद्योगांस आवश्यक पाणी,पाण्याच्या थेंबाथेंबातून अधिकाधिक उत्पादन करणे,ग्रामीण व शहरी भागांत पाण्याचा काटकसरीने वापर आणि सुक्ष्म सिंचन,आधुनिक तंत्रज्ञान,कल्पक पीक पध्दतीव्दारे महाराष्ट्र समृध्द करण्याचा महाराष्ट्र शासनाच्या दृढ संकल्पाप्रमाणे भिवंडी निजा.शहर महानगरपालिकेच्यावतीने दि.१६ मार्च २०१६ ते दि.२२ मार्च २०१६ मध्ये जलजागृती सप्ताहामध्ये महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागामार्फत संपूर्ण भिवंडी शहरामध्ये १७ मार्च -दवंडीव्दारे जनजागृती,१८ मार्च प्रभाग समितीनिहाय व शहरातील मुख्य ठिकाणी पथनाट्य सादरीकरण,१९ मार्च मनपा शाळा विद्यार्थ्यांची

जलजागृती व पाणी बचत या विषयावर निबंध स्पर्धा,२० मार्च मुख्य प्रशासकिय इमारत ते धामणकर नाका पर्यंत रॅलीचे आयोजन,२१ मार्च विविध ठिकाणी मनपाच्या पाणी पुरवठा कर्मचा-यांमार्फत नागरींकांशी संवाद,२२ मार्च जागतिक जल दिनानिमित्त पाण्याची किंमत व पाणी बचत चिंतनाचा विषय यावर व्याख्यान,शहरभर जनजागृतीसाठी बॅनर्स्-पोस्टर्स्व्दारे प्रसिध्दी करणे अशा विविध कार्यक्रमामार्फत **जलजागृती सप्ताहातून** महानगरपालिकेच्यावतीने मोठ्या प्रमाणांत जनजागृती करण्यांत येणार असल्याचे मनपा आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी सांगितले.

सदर जलजागृती सप्ताहानिमित्ताने जल प्रतिज्ञा कार्यक्रमांस सौ.विजया कंठे-उपआयुक्त(मुख्यालय),मुख्य लेखापरिक्षक विनोद शिंगटे,कॅफो श्री.हबीब जमादार,सहाय्यक आयुक्त(प्रशासन)श्री.सुभाष झळके,कार्यकारी अभियंता-बांधकाम श्री.अरुण निरभवणे,नगररचनाकार श्री.प्र.शा.रविराव,प्रभाग अधिकारी श्री.एच.पी.माने,अशोक लाडकर,माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री.सुनिल झळके,समाजसेवक श्री.उमेश भोईर,शहर विकास विभाग प्रमुख श्री.बिपीन साप्ते,आपत्कालिन विभाग प्रमुख श्री.नामदेव गायकवाड इ.अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाणी वाचवा...पाणी वाचवा विद्यार्थ्यांच्या घोषणांच्या माध्यमातून,<br>भिवंडीत रॅलीव्दारे जनजागृती

पानी है सोना,इसे मत खोना,पाणी हे जीवन आहे,अशा घोषणा देत विद्यार्थ्यांनी भिवंडी महानगरपालिकेतर्फे आयोजित केलेल्या रॅलीतून जनजागृती करण्यांत आली.पावसाचे पाणी यंदा व्यवस्थित न पडल्यामुळे सर्वत्र जी तीव्र पाणी टंचाईचे प्रश्न निर्माण झालेले आहे,त्यावर सर्वांनी आत्मचिंतन करुन पाण्याचे प्रत्येक थेंब आपण प्रत्येकाने वाचविला पाहिजे व या प्रत्येक थेंबाची बचत करीत पाण्याची उपलब्धता आपणच करुन नियोजन करण्याची काळाचीच गरज बनली असल्याने जलजागृती सप्ताहाचे उद्घाटन भिवंडीचे महापौर,श्री.तुषार यशवंत चौधरी यांच्या हस्ते करण्यांत आलेल्या व भिवंडी महानगरपालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी आज शासन निर्देशानुसार पाणी बचतीसाठीचे महत्व लोकसहभागातून व्हावे यासाठी आज मनपा व खाजगी शाळांच्या विद्यार्थी,मनपा अधिकारी,कर्मचारी यांच्या सहभागाने नवीन मुख्य प्रशासकिय इमारत ते धामणकर नाका पर्यंत जलजागृती सप्ताहानिमित्त महानगरपालिकेने आज नागरीकांच्या,जनजागृतीसाठी रॅलीचे आयोजन करण्यांत आलेले होते.

पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या जल संपदा विभागामार्फत सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.मात्र पाणी टंचाईचा प्रश्न हा जनतेचा सक्रिय सहभाग व सहकार्य मिळाल्याशिवाय संपूर्ण महाराष्ट्रांत पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पाण्याची सर्वत्र तीव्र टंचाई भासू लागली आहे.भविष्यामध्ये पाणी व्यवस्थितपणे पुरविणे अनिवार्य झाल्याने प्रत्येकाने पाण्याची बचत करणे गरज बनलेली आहे.त्यामुळे शासनाच्या निर्देशानुसार लोकसहभागातून जल समृध्दीकडे राज्यातील प्रत्येक व्यक्ती-शेती-उद्योगांस आवश्यक पाणी,पाण्याच्या थेंबाथेंबातून अधिकाधिक उत्पादन करणे,ग्रामीण व शहरी भागांत पाण्याचा काटकसरीने वापर आणि सुक्ष्म सिंचन,आधुनिक तंत्रज्ञान,कल्पक पीक पध्दतीव्दारे महाराष्ट्र समृध्द करण्याचा महाराष्ट्र शासनाच्या दृढ संकल्पाप्रमाणे आज जनजागृतीसाठी या रॅलीचे आयोजन करण्यांत आलेले होते.

आजच्या रॅलीसाठी सौ.विजया कंठे-उपआयुक्त(मुख्यालय),शहर अभियंता श्री.सुधीर बोरीकर,सहाय्यक आयुक्त(प्रशासन)श्री.सुभाष झळके,कार्यकारी अभियंता-बांधकाम श्री.अरुण निरभवणे,प्रभाग अधिकारी श्री.एच.पी.माने,अशोक लाडकर,माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री.सुनिल झळके,पाणी पुरवठा अभियंता लक्ष्मण गायकवाड इ.अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते परंतू मनपा व खाजगी शाळेतील एक हजार विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती.मनपाच्या या रॅलीसाठी पोलिस,वाहतूक पोलिसांनी महानगरपालिकेस उत्तम सहकार्य केले.

## रुग्णवाहीका नसल्यास पोलिस व्हॅनने रुग्णांना रुग्णलायांत दाखल करणे गरजेचे.

**- महापौर श्री.तुषार चौधरी**

अपघात किंवा रुग्णांचे जीव वाचविण्याच्या अतितात्काळ परिस्थितीमध्ये वेळेवर रुग्णवाहीका उपलब्ध न झाल्यास पोलिसांनी अजिबात वेळ न दवडता रुग्णांचे मौल्यवान जीव वाचेल यादृष्टीकोनामधून पोलिस वाहनांचा उपयोग करुन रुग्णांना वेळेवर रुग्णांलयांत दाखल केल्यास अशा रुग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध झाल्याने,रुग्णांचे जीव वाचतील.असे भिवंडी महानगरपालिकेचे महापौर,श्री.तुषार यशवंत चौधरी यांनी नुकताच रस्त्यांवरुन जाणा-या **रुग्णवाहीकेस रस्ता द्या व प्राण वाचवा अभियान** या भिवंडी महानगरपालिका,पोलिस,वाहतुक पोलिस व राधी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या जनजागृती कार्यक्रमांत नागरीक व समाजातील प्रत्येक जबाबदार व्यक्तींना उद्देशून त्यांनी मार्गदर्श करतांना म्हटले.यावेळी भिवंडी महानगरपालिका आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर,पोलिस उपायुक्त श्री.सुधीर दाभाडे,मनपा उप-आयुक्त(मुख्यालय)सौ.विजया कंठे,सहाय्यक पोलिस आयुक्त श्री.चंद्रकांत जोशी(पूर्व),श्री.रविंद्र भोसले(पश्चिम)भोसले व राधी फाऊंडेशनच्या डॉ.रीटा सावला हे उपस्थित होते.

ह्दयविकार,रेल्वे-रस्ते अपघातातून रुग्णांच्या जीवाला धोका होऊ नये अशावेळी तातडीने जीव वाचविण्यासाठी जनजागृती करण्याच्या कार्यक्रमाचा शुभारंभ महापौर श्री.तुषार चौधरी यांच्या हस्ते त्यांवेळी त्यांनी उपस्थितांना व पोलिसांनाच रुग्णांचे जीव वाचविण्यासाठी पोलिस वाहनांचा वापर करण्याचे आवाहन केले.महानगरपालिकेच्या जुन्या प्रशासकिय इमारतीत चौथ्या माळ्यावरील सभागृहांमध्ये कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी मनपा-पोलिस-वाहतुक पोलिस यांनी प्रसिध्दीसाठी बनविलेल्या बॅनर्स,स्टीकर्स्चे उपस्थितांच्या हस्ते उद्घाटन करण्यांत आले.

रुग्ण वाहतुक किंवा रस्त्यांमध्ये आपले प्राण गमावतात यामुळे संपूर्ण शहरातील रस्त्यांवरील हातगाड्यांवर तात्काळ कारवाई व भाजी विक्रेत्यांसाठी साईटनं.५४ मध्ये नवीन मार्केटसाठी आम्ही उपाययोजना करणार असल्याचे मनपा आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांनी सांगितले.यावेळी नागरीक,रिक्षा-ट्रक चालक यांनी आवाहन करतांना पोलिस उपायुक्त श्री.सुधीर दाभाडे यांनी आवाहन करतांना सांगितले की,रस्त्यावर आपण गाड्या चालवितांना प्रथम प्राधान्याने रुग्णवाहीकांना रस्ता मोकळा करुन देऊन,रुग्णांचे प्राण वाचविण्यांस आपले प्रथम कर्तव्य पार पाडावे.यानंतर राधी फाऊंडेशनच्या डॉ.रीटा सावला यांचेही भाषण झाले.

याप्रसंगी शहरातील मनपा - पोलिस - वाहतुक अधिकारी ,रिक्षा चालक - ट्रक - टेम्पो चालक संघटना, उत्पादक ,विक्रेते, एनजीओज, ॲम्बूलन्स्, मालक, संघटना, हॉस्पीटल, मालक, संघटना, होमगार्ड, पोलिस, सिव्हील डिफेन्स् व्यापारी मंडळे इ. मंडळी मोठ्या संख्येत उपस्थित होती.

## शहीद दिनानिमित्त भारताच्या अमर शहीदांना भिवंडी मनपातर्फे अभिवादन.

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील अग्रस्थानी असलेले वीर शहीद भगतसिंग,सुखदेव व राजगुरु यांचे नांवे देशातील अमर शहीदांमध्ये आदरपूर्वक व मानाने घेतली जातात,त्याचा सर्व देशवासीयांना अभिमान आहेच.लाहोरच्या षड्यंत्राबाबत त्यांच्यावर आरोप ठेवीत,या शहीदांना अटक करुन फाशीची शिक्षा सुनावली,फाशीवर चढतानांही ते हसत-हसत फासाच्या दोरीला चुंबीत **इन्कलाब झिंदाबाद,हिंदुस्थान झिंदाबाद** अशा घोषणा देत देशासाठी फासावर गेले,तो दिवस म्हणजे शहीद दिन.देशासाठी आपल्या प्राणाचे बलिदान देणा-या या वीर शहीदांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी शासन निर्देशानुसार व मनपा आयुक्त श्री.बालाजी खतगांवकर यांच्या आदेशाप्रमाणे भिवंडी महानगरपालिकेच्या तिस-या मजल्यावरील स्व.विलासराव देशमुख सभागृहामध्ये महापौर श्री.तुषार यशवंत चौधरी यांच्या हस्ते तीनही शहीदांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने शहीदांना अभिवादन करण्यांत आले.

शहीद भगतसिंग,सुखदेव व राजगुरु यांनी ऐन तारुण्यांत देशासाठी प्राणाची बाजी लावली,त्यांच्या देशभक्तीला अपराधाचे गंभीर स्वरुप देत इंग्रज सरकारने २४ मार्च १९३१ रोजी फाशीची शिक्षा ठोठावली होती परंतू देशामध्ये जनतेच्या

भावनांचा उद्रेक होऊ नये व होणा-या जनांदोलन,जनाक्रोशाने सरकार अडचणीत येऊ नये त्याकरीता त्यांनी वेळीच निर्णय घेत २३ मार्च १९३१ रोजी काळोख्या रात्रीच फाशी दिली आणि घाईघाईतच त्यांचे सतलजच्या किना-यावर अंतिम संस्कारही उरकून घेतले.त्यामुळे देशाचे हे वीर शहीद क्रांतीकारक नवजवान व युवकांचे प्रेरणास्त्रोत झाले.देशासाठी प्राण पणाला लावलेल्या या तीनही शहीदांना देश व देशातील जनता कधीही विसरणार नाही आणि त्यांच्या कार्याचा विसर पडू नये म्हणून शहीद दिनाच्या दिवशी त्यांना विनम्र अभिवादन करण्याचे निर्देश शासनाने दिल्यामुळे या कार्यक्रमाचे आयोजन भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने करण्यांत आले.

यांप्रसंगी महापौर श्री.तुषार चौधरी यांच्यासह उप-आयुक्त(कर)श्री.अनिल डोंगरे,सहाय्यक आयुक्त(प्रशासन)श्री.सुभाष झळके,माहिती व जनसंपर्क अधिकारी श्री.सुनिल धाऊ झळके आणि महानगरपालिकेतील अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.